University of Mumbai

**अतिमहत्वाचे**

Contact No. : 022-22708738
022-22618987

Email ID : supt.statunit@gmail.com

**सांख्यिकी कक्ष, फोर्ट**
मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १४ डिसेंबर, २०१६.

**UDSTAT/ICD/2016-17/ 166 of 2016**

**परिपत्रक :–**

**विषय :– अशासकिय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांच्या तुकडयांची संख्या उपलब्ध करून देणेबाबत.**
**सदर्भ :– क्र./वेप–१/संकीर्ण /विद्यार्थीसंख्या/२०१६/१६४३ दिनांक ०३–१२–२०१६.**

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थामधील प्राचार्य, संचालक व संस्था यांचे सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई, यांच्या मार्फत आलेल्या पत्राकडे आपले लक्ष वेधू इच्छिते की,

राज्यातील शासकीय व अशासकिय (अनुदानित) महाविद्यालयांना अनुदान मंजूर करताना प्रत्येक विद्याशाखेच्या तुकडयांची प्रवेश क्षमता विचारात घेण्यात येते, त्या अनुशंगाने राज्यशासनास शहरी अदिवासी, ग्रामीण व महिला इ. वर्गातील महाविद्यालयांमध्ये असलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता प्रत्येक तुकडीमध्ये किमान किती विद्यार्थी आवश्यक आहेत ? याबाबतचे निकष मांडण्यात आलेले आहेत. शासनाने राज्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयास अनुदान योजना सुरू केलेली आहे, आणि म्हणून संबधित बाब लक्षात घेता सदर अनुदान योजना लागू करताना संबधित सर्व अशासकीय (अनुदानित) महाविद्यालयांची निकषांबरोबर निश्चित केलेल्या संख्येच्या निकषाचे पालन करणे अनिवार्य आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त माहीतीचा सारांक्ष लक्षात घेता आपल्या अशासकीय (विनाअनुदानित) महाविद्यालयांची तत्संबंधित तुकडयांमधील विद्यार्थी संख्येबाबतची अत्यावश्यक असलेली माहिती संचालनालयास व विविध प्राधिकरणास इत्यादीसाठी उपयुक्त असल्याकारणाने ती त्वरीत http://mu.ac.in/portal/wp-content/uploads/2014/06/Division-wise-format.xlsx या वेबसाईटवर दिलेल्या Formats प्रमाणे भरून सदर कक्षास सादर करणे अत्यंत गरजेचे आहे.

संबधित अशासकीय ( अनुदानित/विनाअनुदानित ) महाविद्यालयांची माहिती विहित नमुन्यात दिलेल्या रकान्यानुसार ( प्रत संलग्न ) हार्ड कॉपी स्वरूपात अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, खोली क्र. २०२, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई–४०० ०३२. यांच्याकडे **दिनांक २३ डिसेंबर, २०१६** रोजी तात्काळ भरून पाठविण्याची व्यवस्था करावी त्याचप्रमाणे तत्संबधित काही अडचणी आढळल्यास 022 -22708738/22618987 या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, ही विनंती.

आपली विश्वासू,

सही /–
अधिक्षक
(संख्यिकी कक्ष)